सं. फौ. ख. क्र. २७३०/२०१३
शासन विरूध्द मनोज

MHTH130032112013

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | :- | २२/०८/२०१३ |
| नोंदणी तारीख | :- | २२/०८/२०१३ |
| निकाल तारीख | :- | ०३/०८/२०२६ |
| कालावधी | :- | १२ ११ १२<br>वर्षे महिने दिवस |

**भाग अ***
**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१) ]**

| उल्हासनगर येथील न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, उल्हासनगर यांचे न्यायालयात<br>( पिठासीन अधिकारी : ई. पी. रॉड्रिक्स) | |
|---|---|
| पहिल्या खबरीचा तपजेठानंद | अपराध क्र. -T-७६/२०१३<br>उल्हासनगर पोलिस स्टेशन |
| न्यायनिर्णयाची तारीख | दि. ०३.०८.२०२६ निशाणी क्र. ४२ |
| प्रकरण क्रमांक<br>तक्रारकर्ता/ अभियोग पक्ष | नियमीत फौजदारी प्रकरण क्रमांक २७३०/२०१३<br>महाराष्ट्र शासन मार्फत/ व्दारा ठाणे अंमलदार, उल्हासनगर पोलिस स्टेशन, (फिर्यादी- कुनाल दिपक चंचलानी .) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | श्री. एन. एन. सपकाळे (सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता ) |
| आरोपी | **मनोज मच्छाराम जेसवानी,**<br>वय-३९, व्यवसाय- व्यापार,<br>रा. हजारी व्हीला रूम नंबर ४०१, पोस्ट ऑफिसजवळ, उल्हासनगर-०१, जि. ठाणे. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | श्री. मलकानी (बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब ***
**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२) ]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १३.०३.२०१३ |
| पहिल्या खबरीची तारीख | १५.०३.२०१३ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २२.०८.२०१३ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | ०६.०९.२०१८ |
| पुराव्याला सुरवात झाल्याची तारीख | ०५.११.२०२२ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०३.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०३.०८.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | --- |

## आरोपींबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष | दिलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मनोज मंच्छाराम जेसवानी | २२.०६. २०१३ | --- | भारतीय दंड विधान कलम ३३६, ३३७, ५०६ प्रमाणे | निर्दोषमुक्त् | --- | --- |

**भाग क ***

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३) ]**

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्षः</u>**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | कुनाल दिपक चंचलानी (निशाणी क्र. १३) | फिर्यादी |
| सा.क्र.२ | दिपक केरूमल चंचलानी(निशाणी क्र. १८) | साक्षीदार |
| सा.क्र.३ | आरती दिपक चंचलानी (निशाणी क्र. २७) | साक्षीदार |
| सा.क्र.४ | डॉ. करण गुलाब बालानी (निशाणी क्र. ३०) | डॉक्टर साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| सा.क्र.५ | डॉ. अंजली योगेश चौधरी (निशाणी क्र. ३३) | डॉक्टर साक्षीदार |
| सा.क्र.६ | नरेश मोहनदास अंबवानी (निशाणी क्र. ३५) | साक्षीदार |
| सा.क्र.७ | सागर ज्ञानदेव निकम (निशाणी क्र. ३८) | तपासी अधिकारी |

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्षः</u>**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | निशाणी क्रमांक १४ | फिर्याद |
| २. | निशाणी क्रमांक ३१ | प्रिस्क्रीप्शन |
| ३. | निशाणी क्रमांक ३२ | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ४. | निशाणी क्रमांक ३४ | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ५. | निशाणी क्रमांक ३९ | घटनास्थळ पंचनामा |

**ब. <u>महत्वाच्या वस्तुः</u>**

| **अ.क्र.** | **महत्वाची वस्तु क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| --- | --- | --- |

***न्या य नि र्ण य***

**(दिनांक ०३.०८.२०२६ रोजी घोषीत)**

आरोपीविरुध्द प्रस्तुतचा खटला भारतीय दंड विधान कलम ३३६, ३३७, ५०६ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गून्हयासाठी चालवण्यात आला.

**अभियोग पक्षाच्या खटल्याची संक्षिप्त हकीकत पुढील प्रमाणे :**

०२] दिनांक १३.०३.२०१३ रोजी १९:३० वाजताच्या सुमारास सार्वजनिक रोडवर, शिवलीला बिल्डींगजवळ, उल्हासनगर-०१ येथे सदरचा अपराध घडला. फिर्यादी याने पुर्वी दिलेली तक्रार मागे घेत नाही या गोष्टीचा राग आरोपीला येऊन त्याने

फिर्यादीला हाताने उचलुन रस्ताच्या बाजुला असलेल्या कठडयावर हयगयीने बेदरकारपणे फेकुन देऊन दुखापत केली. म्हणुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

०३] सदरील खबरीनुषंगे उल्हासनगर पोलिसांनी गुन्हा नोंदणी क्र. ७६/२०१३ नोंदवुन, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री. निकम यांच्याकडे सुपूर्द केला. तपास अधिका-याने तपासादरम्यांन घटनास्थळी जाऊन घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, आरोपीस नोटीस दिली. तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्यामुळे वरनमुद कलमानुषंगे दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

०४] माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्रमांक ७ अन्वये भारतीय दंड विधान कलम ३३६, ३३७, ५०६ अन्वये दोषारोप निश्चीत केला. सदरचा दोषारोप त्यांना समजणा-या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता, त्यांनी गुन्हा नाकबूल केल्यामुळे प्रस्तुतचा खटला पुढे चालविण्यात आला.

०५] एकूणच अभिलेखावरील पुराव्याचा विचार करता दिनांक ०९/०७/२०२६ रोजी अभियोगपक्षाचा निशाणी क्र. १ वर पुरावा बंद केला.

०६] आरोपीविरुध्द गुन्हयात सहभाग दर्शविणारा असा पुरावा आल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आले. त्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, आरोपीला दोन मुली असल्याने फिर्यादी हा आरोपीच्या दोन्ही मुली यांची छेड काढत असल्याने फिर्यादी यांची तक्रार आरोपीने सोसायटीमध्ये केली होती. त्यामुळे त्याची बदनामी झाली व सोसायटीमधुन लोकांनी फिर्यादी व त्याच्या पालकांना समजवण्यात आले होते त्याचा राग मनात धरून फिर्यादीने आरोपीविरूध्द खोटी केस दाखल केली जी फिर्यादीने पाहिले केस दाखल केली होती त्यामध्ये आरोपी निर्दोष मुक्त झाला आहे व सदर खोटी केस दाखल केल्याचे त्यांनी कथन केले.

०७] एकुणच आरोपीताविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप आणि अभियोगपक्षाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या पुराव्याचा विचार करता, निर्णयापावेतो पाहोचण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत. सदरील मुद्दयांवरील निष्कर्ष खाली दिलेल्या कारणांस्तव त्यापुढे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १३.०३.२०१३ रोजी १९:३० वाजताच्या सुमारास सार्वजनिक रोडवर, शिवलीला बिल्डींगजवळ, उल्हासनगर-०१ येथे तुम्ही आरोपीने फिर्यादी यांना उचलून इतक्या बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणे फेकले की त्यामुळे मानवी जीवित किंवा इतरांच्या वैयक्तिक सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आणि याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहितेच्या कलम ३३६ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी. |
| २. | वरनमुद तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादी यांना रस्त्याच्या कडेला इतक्या बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणे फेकून दुखापत केली की ज्यामुळे मानवी जीवित किंवा इतरांच्या वैयक्तिक सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहितेच्या कलम ३३७ अन्वये गून्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी. |
| ३. | वरनमुद तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादी यांना घाबरवण्याच्या उद्देशाने त्यांच्या जीवाला इजा करण्याची धमकी देऊन गुन्हेगारी धमकी दिली आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम ५०६ अन्वये गून्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>मुद्दा क्रमांक १ ते ३ साठी :-</u>

०८] मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे, त्यानुषंगेच्या पुराव्याची पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतरित्या विचारार्थ घेण्यात येत आहेत. प्रस्तुत खटल्याकामी आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षास यांना उचलून इतक्या बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणे फेकले की त्यामुळे मानवी जीवित किंवा इतरांच्या वैयक्तिक सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्याचे सबळ पुराव्यानिशी सिध्द करावे लागेल.

०९]  सदरची बाब सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाच्या वतीने साक्षीदार क्र.१ फिर्यादी कुणाल दिपक चंचलानी यांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, त्यांच्या घरी ते, त्यांचे आई-वडील व आजी-आजोबा असे राहतात. सन २०१३ मध्ये ते शिक्षण घेत होते. दिनांक १३/०३/२०१३ च्या पाच महिने आधी आरोपीच्या बिल्डिंगमध्ये त्यांचा मित्र हेमंत बेहराणी राहतो, त्यामुळे ते तिथे क्रिकेट खेळत होते. त्यावेळी मनोज जेसवानी याचा मुलगा आला व त्याला सुद्धा क्रिकेट खेळायचे होते. परंतु त्यांनी त्याला खेळण्यासाठी घेतले नाही कारण तो प्रत्येक वेळी चिटिंग करतो. त्यानंतर तो त्याचे वडील मनोज जेसवाणी यांना घेऊन आला. मनोज जेसवाणी त्यांना व त्यांचा मित्र भावेश ओचानी असे दोघांना घेऊन त्यांच्या घरी गेले. त्यांनी त्या दोघांचे हात ओढणीने बांधले व त्यांना लाटण्याने मारहाण केली. त्यावेळी त्यांनी उल्हासनगर-१ पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली होती. परंतु त्यानंतर आरोपी त्यांना केस मागे घेण्याबाबत धमकी देत होता. दिनांक १३/०३/२०१३ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता त्यांचा क्लास होता. ते क्लासमधून बाहेर येत होते त्यावेळी आरोपी बाहेर उभे होते. त्यामुळे त्यांनी त्यांना बघून घाबरून पुन्हा क्लासमध्ये गेले व थोडा वेळ क्लासमध्ये बसले. त्यानंतर थोड्या वेळाने ते क्लासमधून बाहेर आले तेव्हा आरोपी तिथे नव्हते. ते तेथून निघून शिवलीला बिल्डिंगजवळून घरी जात होते. त्यावेळी तिथे आरोपी त्यांच्या पाठीमागून आला व त्याने त्यांना ढकलले. त्यामुळे ते पोलवर पडले व त्यामुळे त्यांच्या उजव्या डोळ्याच्या खाली, कानावर व डोक्यावर लागले होते. ते तिथेच बेशुद्ध पडले होते. तीन-चार लोक त्यांना नरेश डॉक्टरांकडे घेऊन गेले. तिथे त्यांना शुद्ध आली व त्यांनी त्यांच्या वडिलांना फोन केला होता. त्यांचे वडील बाहेर होते, त्यामुळे त्यांनी त्यांच्या मामांना पाठवले. त्यांचे मामा त्यांना आस्था हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले. त्यावेळी त्यांच्या मामाने काय झाले याबाबत विचारले असता त्यांनी घाबरून त्यांना त्यांचा पाय घसरून पडल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांची आई आली. त्यांनी त्यांच्या आईला घडलेले सर्वकाही सांगितले. त्यानंतर ते घरी आले व दुसऱ्या दिवशी पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद (निशाणी क्र. १४) दाखल केली.

१०]  त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, ज्या दिवशी घटना घडली त्यावेळी त्यांचे वय १२ वर्षे होते. त्यावेळी आरोपीच्या मुलाचे वय किती होते, हे ते सांगू शकत नाहीत. त्यावेळी आरोपीचा मुलगा आठ वर्षांचा होता हे त्यांना माहीत नाही. आरोपीचा मुलगा त्यांचा मित्र नव्हता. ते व त्यांचे मित्र आरोपीच्या बिल्डिंगमध्ये तळमजल्यावर क्रिकेट खेळण्यासाठी गेले होते. ते व त्यांचे मित्र आरोपीच्या बिल्डिंगमध्ये तळमजल्यावर क्रिकेट खेळण्यासाठी गेले होते त्यावेळी जो मुलगा खेळण्यासाठी आला होता तो आरोपीचा मुलगा होता हे त्यांना माहीत नव्हते. दिनांक १३/०३/२०१३ च्या

पाच महिने आधी ज्यावेळी आरोपीने त्यांचे हात बांधले होते त्यावेळी ते मनोज जेसवाणी आहेत हे त्यांना माहीत झाले. ज्यावेळी ते व भावेश आरोपीच्या घरातून निघाले त्यावेळी हेमंतने आरोपीचे नाव मनोज जेसवाणी आहे असे सांगितले. आरोपीच्या घरी ज्यावेळी त्यांना नेले होते त्यावेळी आरोपीच्या घरी त्याची पत्नी, दोन मुली व एक मुलगा असे होते. आरोपीचे घर पाचव्या माळ्यावर आहे. त्यांचा मित्र हेमंत बेहरानी हा आरोपीच्या बिल्डिंगमध्ये सहाव्या माळ्यावर राहतो. जेव्हा ते आरोपीच्या बिल्डिंगमध्ये जातात त्यावेळी पाचव्या माळ्यावर उतरतात व तेथून सहाव्या माळ्यावर जातात. त्यांनी आरोपीविरुद्ध दाखल केलेल्या नि.फौ.ख.क.२२/२०१३ मध्ये आरोपीची निर्दोष मुक्तता झाली आहे किंवा कसे हे त्यांना माहीत नाही. पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला त्यावेळी जबाबामध्ये त्यांचे वय १५ वर्षे नमूद केले आहे, कारण ते त्यावेळी १५ वर्षांचे असतील म्हणून पोलिसांनी त्यांच्या जबाबामध्ये त्यांचे वय १५ वर्षे लिहिले आहे. जबाब देतेवेळी त्यांनी पोलिसांना सांगितले होते की, आरोपीने त्यांना व त्यांचा मित्र भावेश ओचानी असे दोघांना घेऊन त्यांच्या घरी गेले, त्यांनी त्या दोघांचे हात ओढणीने बांधले व त्यांना लाटण्याने मारहाण केली, परंतु तसा मजकूर त्यांच्या जबाबात का नमूद नाही याचे कोणतेही कारण ते सांगू शकत नाहीत. ज्यावेळी घटना घडली त्यावेळी त्यांच्यासोबत इतर कोणीही नव्हते. ते बेशुद्ध झाल्यानंतर त्यांना कोणी व कसे नेले, हे त्यांना माहीत नाही. घटनास्थळावरून डॉ. नरेश यांचा दवाखाना दोन ते पाच मिनिटांच्या अंतरावर आहे. दवाखान्यात गेल्यावर थोड्या वेळाने ८.०० ते ८.१५ वा.च्या सुमारास ते शुद्धीवर आले. त्यांना ज्या लोकांनी दवाखान्यात घेऊन गेले होते ते लोक कोण आहेत याबाबत डॉक्टरांनी विचारपूस केली किंवा कसे, हे त्यांना माहीत नाही. नरेश डॉक्टर यांच्या दवाखान्यातून आस्था हॉस्पिटलमध्ये ते स्वतःच गेले होते. आस्था हॉस्पिटलमधून त्यांना त्याच दिवशी डिस्चार्ज मिळाला, परंतु किती वाजता सोडले ते त्यांना आठवत नाही. रात्री ९.०० ते ९.३० वा.च्या दरम्यान ते आस्था हॉस्पिटलमध्ये गेले होते. घडलेली घटना त्यांनी त्यांच्या आईला दिनांक १४/०३/२०१३ रोजी सांगितली. दिनांक १४/०३/२०१३ रोजी त्यांची तब्येत खराब असल्याने ते त्या दिवशी पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेले नाहीत. इतर सर्व विधाने त्यांनी नाकारली.

११] सदरची बाब सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाच्या वतीने साक्षीदार क्र.२ दिपक केरूमल चंचलानी यांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, सन २०१२ मध्ये त्यांचा मुलगा आरोपीच्या बिल्डिंगमध्ये खेळत होता. आरोपीच्या मुलाला खेळवत नव्हते. म्हणून आरोपीच्या पत्नीने त्यांच्या मुलाला घरामध्ये बांधून ठेवले. त्यानंतर आरोपीच्या शेजाऱ्यांनी त्यांना फोन करून सांगितले. त्यावेळी त्यांची पत्नी आरोपीच्या घरी गेली तेव्हा तिला आरोपी व त्याच्या पत्नीने लाटण्याने व लाकडाने मारले. त्यांच्या मुलाच्या कानाचा पडदा फाटला

होता. त्यानंतर त्यांनी तक्रार दिली होती. आरोपी हे नेहमी त्यांच्या मुलाला जिथे भेटेल तेथे रागाने बघत होते, म्हणून तो घरी पळून यायचा. खूप साऱ्या नगरसेवकांकडून आरोपीने त्यांना सदरची केस काढण्यास सांगितली, परंतु त्यांनी काढली नाही. दिनांक १३/०३/२०१३ रोजी ते कल्याणमध्ये असताना त्यांच्या मुलाच्या मित्राचा त्यांना फोन आला की, तुमचा मुलगा कचरा कुंडीच्या बाजूला पडला आहे, त्याला डोळ्याच्या वर मार लागला आहे. त्यांनी लगेच त्यांच्या पत्नीला व मेव्हणा नामे नरेश यास फोन केला. त्यांना यायला दोन तास लागले. तोपर्यंत त्यांच्या मुलाला आस्था हॉस्पिटलमध्ये त्यांची पत्नी व मेव्हणे घेऊन गेले. त्याला खूप मार लागला होता म्हणून त्याला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. त्यावेळी त्यांचा मुलगा शुद्धीत नव्हता. त्यानंतर दिनांक १५/०३/२०१३ रोजी त्यांच्या मुलाने सांगितले की, तो क्लासमधून बाहेर पडत होता तेव्हा आरोपी पल्सर गाडीवर आला म्हणून तो परत क्लासेसमध्ये गेला. थोड्या वेळाने त्यांच्या मुलाने पाहिले तर आरोपी तिथे नव्हता म्हणून तो घरी येण्यासाठी निघाला. तेव्हा आरोपी आला व त्याने त्यांच्या मुलाला लाईटच्या खांबावर आपटले. त्यामुळे त्यांच्या मुलाच्या डोळ्याच्या वर सात ते आठ टाके पडले होते. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

१२] त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, दि. १३.०३.२०१३ रोजी घटना घडली होती. ते कल्याणहून भिवंडीला चालले होते. त्यांच्या मुलाच्या मोबाईलवरून फोन आला व त्यांच्या मुलाचा मित्र भावेश याने त्यांना सांगितले की, हेमराज मिल्क डेअरीच्या बाजूला असलेल्या शासनाच्या खांबाच्या बाजूला त्यांचा मुलगा पडलेला आहे. जेव्हा घटना घडली तेव्हा ते घटनास्थळावर नव्हते. दि. १३.०३.२०१३ रोजीच त्यांना घटनेबाबत कळाले. रात्री ११.३० वाजता ते आस्था हॉस्पिटलला गेले. दि. १४.०३.२०१३ रोजी त्यांनी स्वतः त्यांच्या मुलाला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्यांनी पोलीसांना दि. १५.०३.२०१३ रोजी घटनेबाबत सांगितले. दि. १३.०३.२०१३ रोजी त्यांना त्यांच्या मुलाने अपघात झाल्याचे खोटे सांगितले असल्याने त्यांनी त्यादिवशी पोलीसांना तक्रार दिली नाही व दि. १५.०३.२०१३ रोजी त्यांना त्यांच्या मुलाने सदर घटनेबाबत सांगितल्याने त्यांनी त्यादिवशी पोलीसांना तक्रार दिली. इतर सर्व विधाने त्यांनी नाकारली.

१३] सदरची बाब सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाच्या वतीने साक्षीदार क्र.३ आरती दिपक चंचलानी यांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, सन २०१३ साली त्या, त्यांचे पती व दोन मुलांसोबत वरील पत्यावर राहत होत्या. त्यांच्या मुलांची नावे जयेश व कुणाल अशी आहेत. दिनांक १३/०३/२०१३ रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास त्यांचा मुलगा कुणाल क्लासवरून घरी येत होता, परंतु तो घरी पोहोचला नाही. त्यांचा भाऊ नरेश अंबवाणी यांनी त्यांना फोन करून सांगितले की, कुणाल हेमराज डेअरीजवळ बेशुद्ध होऊन पडल्याने नरेशने त्याला

डॉक्टरकडे नेऊन पुढे आस्था हॉस्पिटलला ॲडमिट केले. त्यानंतर त्या व त्यांचे पती सदर हॉस्पिटलमध्ये गेले तेव्हा कुणाल बेशुद्ध अवस्थेत होता व त्याच्या उजव्या डोळ्याच्या चारही बाजूंनी रक्त येत होते. दिनांक १४/०३/२०१३ रोजी कुणालला शुद्ध आल्यानंतर त्यांनी त्याला विचारले असता तो घाबरत होता व काही सांगत नव्हता. त्याने केवळ तो पडला व त्याला लागले एवढेच सांगितले. दिनांक १५/०३/२०१३ रोजी त्यांनी त्याला हॉस्पिटलमधून घरी नेले. त्यानंतर तो शाळेत व क्लासला जात नव्हता. त्यांनी त्याला शांततेत व प्रेमाने शाळेत व क्लासला न जाण्याचे कारण विचारले असता त्याने सांगितले की, आरोपी मनोज जेसवानी याने कुणालला जीवे मारून टाकण्याची धमकी दिली आहे. त्यांनी त्याला धमकीचे कारण विचारले असता त्याने त्यांना सांगितले की, आरोपीने कुणालला यापूर्वी सन २०१२ मध्ये घरात बांधून ठेवून मारहाण केली होती व सदर घटनेबाबत कोर्टात प्रकरण प्रलंबित आहे. दिनांक १३/०३/२०१३ रोजीच्या घटनेबाबत कुणालने त्यांना सांगितले की, कुणाल क्लासमधून बाहेर आला तेव्हा आरोपी क्लासच्या बाहेर लपून उभा होता. त्याला पाहून कुणाल परत क्लासमध्ये निघून गेला. त्यानंतर पुन्हा कुणाल क्लासमधून बाहेर निघाला असता त्याला आरोपी दिसला नाही म्हणून तो क्लासमधून घरी यायला बाहेर निघाला असता त्याला मागून आरोपीने आवाज दिला. कुणालने मागे वळून पाहिले असता आरोपीने कुणालला उचलून कचऱ्याच्या ढिगाऱ्यात उभ्या असलेल्या लोखंडी खांबावर फेकले. त्यामुळे लोखंडी खांब कुणालच्या उजव्या डोळ्याच्या बाजूला लागून कुणालला दुखापत झाली. नंतर आरोपी तेथून निघून गेला. सन २०१२ सालचे प्रकरण कोर्टातून मागे घेण्यासाठी आरोपीने त्याला मारहाण केल्याचे कुणालने त्यांना सांगितले. त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, पोलीसांनी त्यांचा जबाब दिनांक १५/०३/२०१३ रोजी पोलीस ठाण्यात घेतला होता. कुणालला सन २०१३ मध्ये गाडी चालवता येत नव्हती. त्याला त्यावेळी सायकल चालवता येत होती. इतर सर्व विधाने त्यांनी नाकारली.

१४] सदरची बाब सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाच्या वतीने साक्षीदार क्र.४ डॉ. करण गुलाब बालानी यांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, त्यांची शैक्षणिक पात्रता एम.एस. सर्जरी व एम.सी.एच. प्लास्टिक सर्जरी अशी आहे. ते सन १९९५ पासून उल्हासनगर येथे वैद्यकीय सल्लागार म्हणून व्यवसाय करीत आहेत. त्यांच्या हॉस्पिटलचे नाव आस्था हॉस्पिटल असून ते उल्हासनगर-०३ येथे स्थित आहे. दिनांक १३.०३.२०१३ रोजी ते हॉस्पिटलमध्ये उपस्थित होते. त्या दिवशी रात्री १०.०० वाजता कुणाल चंचलानी नावाचा रुग्ण त्यांच्या हॉस्पिटलमध्ये आला होता. त्याने तो पडला असून त्यास दुखापत झाल्याचे सांगितले होते. तपासणीअंती खालील दुखापती दिसून आल्या. १. अनेक चिरलेल्या जखमा (Multiple Lacerations) – ग्लॅबेला भागावर ३.५ सें.मी. लांब, हाडापर्यंत खोल,

तीक्ष्ण कडा असलेली. २. उजव्या गालाच्या (Right Malar Region) भागावर २ सें.मी. लांब, त्वचेखाली खोल जखम. ३. उजव्या कपाळावर (Right Forehead) १ सें.मी. लांब, त्वचेखाली खोल जखम. ४. उजव्या पायावर, डाव्या गुडघ्यावर व डाव्या कोपरावर अनेक खरचटलेल्या जखमा (Multiple Abrasions). ५. स्थानिक भूल (Local Anaesthesia) देऊन ३/० विक्रिल (Vicryl) टाक्यांनी जखमेची दुरुस्ती करण्यात आली. उपचारानंतर रुग्णास घरी सोडण्यात आले व दिनांक १५.०३.२०१३ रोजी फॉलोअपसाठी बोलाविण्यात आले. मात्र रुग्ण दिनांक १५.०३.२०१३ रोजी फॉलोअपसाठी आला नाही. तथापि, दिनांक २०.०३.२०१३ रोजी वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यात आले. सदर प्रमाणपत्रामध्ये दिनांक १३.०३.२०१३ रोजी रुग्णास कोणीतरी मारहाण केल्याचा उल्लेख आहे. आता त्यांना दिनांक १३.०३.२०१३ चे प्रिस्क्रिप्शन (निशाणी क्र. ३१) दाखविण्यात आले. आता त्यांना दिनांक २०.०३.२०१३ चे प्रमाणपत्र (निशाणी क्र. ३२) दाखविण्यात आले.

१५] त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, कोणताही रुग्ण हॉस्पिटलमध्ये आल्यास नेहमी प्रिस्क्रिप्शन दिले जाते. औषधे लिहून दिली जातात, परंतु ती बाहेरून खरेदी करावी लागतात. सदर रुग्णाची तपासणी करण्यापूर्वी पोलीस स्टेशनमधून कोणाचाही त्यांना फोन आला नव्हता तसेच पोलीस स्टेशनमध्ये त्यांचा जबाब नोंदविण्यात आलेला नव्हता. सदर रुग्ण फॉलोअपसाठी का आला नाही याबाबत त्यांनी रुग्णास विचारले होते किंवा कसे, हे त्यांना आठवत नाही. बाह्यरुग्ण (Outdoor Patient) यांची कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. ते नेहमी रुग्णास आवश्यक औपचारिकता पूर्ण करून नंतर त्यांना भेटण्याचा सल्ला देतात. त्यांनी दिनांक १३.०३.२०१३ रोजी सदर रुग्णास सेंट्रल हॉस्पिटलमध्ये रेफर केले नव्हते. सदर प्रमाणपत्र रुग्णाकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार देण्यात आले होते. त्यांचे हॉस्पिटल प्रसूती (Maternity) व प्लास्टिक सर्जरी या विषयातील विशेष तज्ज्ञतेचे आहे. रुग्णाच्या वैद्यकीय इतिहासाची (Patient History) नोंद ठेवली जात नाही. इतर सर्व विधाने त्यांनी नाकारली.

१६] सदरची बाब सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाच्या वतीने साक्षीदार क्र.५ डॉ. अंजली योगेश चौधरी यांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, त्यांची शैक्षणिक पात्रता एम.बी.बी.एस. व डी.पी.एच. अशी आहे. त्या सन २०११ ते २०१४ या कालावधीत उल्हासनगर येथील सेंट्रल हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. दिनांक १५.०३.२०१३ रोजी त्यांची दुपारची ड्युटी दुपारी ३.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत होती. त्या दिवशी कुणाल दीपक चंचलानी, वय १५ वर्षे यास त्याचे वडील दीपक चंचलानी यांनी दिनांक १५.०३.२०१३ च्या पोलीस मेमोसह त्यांच्याकडे आणले होते. त्याने दिनांक

१३.०३.२०१३ रोजी सायंकाळी सुमारे ७.३० वाजता ओळखीच्या व्यक्तींनी मारहाण केल्याचा इतिहास सांगितला होता. त्याला भिंतीवर ढकलण्यात आले होते व त्याने उल्हासनगर येथील आस्था हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले होते. तो चेहऱ्यावर टाके घातलेल्या जखमांसह आला होता. त्यांनी त्याची तपासणी केली असता पुढील दुखापती आढळून आल्या :- १. दोन्ही भुवयांच्या मधोमध कपाळावर ४ सें.मी. लांबीची टाके घातलेली जखम (Sutured wound with sutures in situ). २. उजव्या गालावर ३ सें.मी. लांबीची टाके घातलेली जखम (Sutured wound with sutures in situ). ३. कपाळाच्या उजव्या बाजूस १.५ सें.मी. लांबीची टाके घातलेली जखम (Sutured wound with sutures in situ). ४. डाव्या गुडघ्यावर ३ सें.मी. x २ सें.मी., डाव्या हाताच्या पुढील भागावर (Left Forearm) २ सें.मी. x ३ सें.मी. व डाव्या पायाच्या वरच्या भागावर (Dorsum of Left Foot) २ सें.मी. x २ सें.मी. आकाराच्या खरचटलेल्या जखमा (Abrasions), ज्या अंशतः भरून येत होत्या व त्यामध्ये स्लफ (Slough) व संसर्ग (Infection) होता. ५. उजव्या डोळ्याच्या वरच्या व खालच्या पापणीवर सूज (Swelling in Right Upper and Lower Eyelid). रुग्णास कवटीचा एक्स-रे (X-ray Skull), शस्त्रक्रिया विभाग (Surgery) व नेत्रतज्ज्ञ (Ophthalmologist) यांच्याकडे रेफर करण्याचा सल्ला देण्यात आला. सर्व खरचटलेल्या जखमा साध्या स्वरूपाच्या (Simple in Nature) होत्या. दुखापत क्रमांक १ ते ३ बाबत त्यांनी दुखापतीचे स्वरूप नमूद केले नाही, कारण त्यांनी त्यास पुढील तपासणीसाठी रेफर केले होते. दुखापत क्रमांक १ ते ३ बाबत रेडिओलॉजिस्ट यांनी कोणतेही फ्रॅक्चर नसल्याचे नमूद केले होते. दुखापत क्रमांक ४ व ५ साध्या स्वरूपाच्या होत्या. दुखापतीचे वय २४ तासांपेक्षा जास्त होते. त्यांनी एम.एल.सी. (MLC) रजिस्टरनुसार सदर दुखापतींबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र दिले होते. आता त्यांना वैद्यकीय प्रमाणपत्र दाखविण्यात आले. त्यावर त्यांची सही व हॉस्पिटलचा शिक्का (निशाणी क्र. ३४) आहे. आज ते एम.एल.सी. रजिस्टर सोबत घेऊन आले आहेत. सदर दुखापती एखाद्या व्यक्तीला भिंतीवर ढकलल्यामुळे होऊ शकतात. त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, दिनांक १५.०३.२०१३ नंतर सदर रुग्ण त्यांच्याकडे आला नव्हता. सदर रुग्ण दिनांक १५.०३.२०१३ च्या पोलीस मेमोसह त्यांच्याकडे आला होता. सदर रुग्ण हा केवळ बाह्यरुग्ण (Outdoor Patient) होता. रुग्णाने दुखापत करणाऱ्या व्यक्तीचे नाव सांगितले नव्हते. सदर दुखापती एखादी व्यक्ती जमिनीवर पडल्यास देखील होऊ शकतात. इतर सर्व विधाने त्यांनी नाकारली.

१७] सदरची बाब सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाच्या वतीने साक्षीदार क्र.६ नरेश मोहनदास अंबवानी यांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, ते सन २०१३ मध्ये उल्हासनगर-२ येथे राहत होते. फिर्यादी कुणाल हा त्यांचा भाचा आहे. दि. १३.०३.२०१३ रोजी ते त्या दिवशी दुकानावर होते.

त्यावेळी त्यांचे मेव्हणे दीपक चंचलानी यांचा संध्याकाळी त्यांना फोन आला होता. त्यावेळी त्यांनी त्यांना असे सांगितले की, कुणालला कोणी मारले आहे. तो हिरापन्ना येथे उभा आहे. त्याला घेऊन हॉस्पिटलला जा. त्यानंतर ते त्याला अहुजा हेमनानी डॉक्टरांकडे घेऊन गेले. त्यावेळी त्यांनी त्यांना असे सांगितले की, त्याला जास्त लागले आहे. त्यामुळे त्याला घेऊन आस्था हॉस्पिटलला जा. त्यानंतर ते त्याला आस्था हॉस्पिटल येथे घेऊन गेले. त्याला डोळ्यांजवळ जास्त लागले होते. त्याला दोन दिवस भरती केले होते. सदर दरम्यान तो काही बोलू शकत नव्हता. त्यानंतर त्यांनी त्यांच्या बहिणीला फोन करून तिला हॉस्पिटलला बोलावले. त्यानंतर दि. १५.०३.२०१३ रोजी त्यांच्या बहिणीला कुणालने आरोपीने मारल्याबाबत सांगितले. कुणाल ट्युशनवरून येत असताना आरोपीने मारल्याचे सांगितले. त्याने कसे मारले ते त्यांना माहीत नाही. पोलीसांनी त्यांचा जबाब घेतला होता. त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, त्यांनी पोलीसांना कुणाल हा दोन दिवस हॉस्पिटलमध्ये भरती होता असे सांगितले होते परंतु ते त्यांच्या जबाबात दिसून येत नाही. ज्यावेळी घटना घडली त्यावेळी ते प्रत्यक्ष तेथे हजर नव्हते. त्यावेळी त्यांना कुणालला कोणी मारले याबाबत माहीत नव्हते. मग कुणाल याने सदर आरोपीने मारल्याबाबत त्यांना सांगितले होते. ते स्वतःहून सांगतात की, जेव्हा कुणालला मारले होते त्यावेळी तो बोलू शकत नव्हता. ज्यावेळी सदरची घटना घडली त्यावेळी त्यांनी पोलीसात तक्रार दाखल केली नाही. इतर सर्व विधाने त्यांनी नाकारली.

१८] सदरची बाब सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाच्या वतीने साक्षीदार क्र.७ सागर ज्ञानदेव निकम यांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, सन २०१३ मध्ये ते उल्हासनगर-०१ येथे पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत होते. गु.र.क्र. ७६/२०१३ हा पोलीस ठाणे अंमलदार जोशी यांनी दिनांक १५/०३/२०१३ रोजी दाखल केला होता व तो त्याच दिवशी त्यांच्याकडे तपासकाम करण्याकरिता देण्यात आला. सदर फिर्यादीचे अवलोकन केले असता फिर्यादी कुणाल चंचलानी, वय १५ वर्षे, या मुलास दिनांक १३/०३/२०१३ रोजी सायंकाळी १९:३० वाजताच्या सुमारास शिवलीला बिल्डींग सार्वजनिक रोड येथून घरी जात असताना आरोपी याने यापूर्वी दिलेली तक्रार मागे घेत नाही, या गोष्टीचा राग मनात धरून फिर्यादी यास हाताने उचलून रस्त्याच्या बाजूला असलेल्या कठड्यावर ढकलून दिले. त्यामुळे त्याच्या नाकास, डोक्याला व उजव्या डोळ्याच्या खाली मार लागला व हाताच्या कोपरावर व पायाच्या गुडघ्यावर मार लागला, अशा स्वरूपाची तक्रार त्यांनी दिली. सदरचा प्रकार हा दिनांक १३/०३/२०१३ रोजी घडला होता व तो घाबरल्यामुळे त्यांनी सदरची तक्रार दिनांक १५/०३/२०१३ रोजी दिली. आता त्यांना दाखविण्यात आलेली प्रथम खबर तीच असून त्यावर फिर्यादी व जोशी यांची सही आहे. जोशी यांच्यासोबत काम केल्याने ते त्यांची सही ओळखतात. सदर प्रथम खबर ही निशाणी

१४ येथे दाखल आहे. त्यानंतर त्याच दिवशी घटनास्थळ पंचनामा करण्यात आला. सदरचे घटनास्थळ हे फिर्यादी यांनी दाखविले होते. घटनास्थळ हे शिवलीला बिल्डींग सार्वजनिक रोडवर होते. सदर पंचनामा हा दोन पंचासमक्ष करण्यात आला होता. आता त्यांना दाखविण्यात आलेला पंचनामा (निशाणी क्रमांक ३९) हा तोच असून त्यावर त्यांची व दोन पंचांची सही आहे. त्यानंतर फिर्यादी यांनी आस्था हॉस्पिटल येथे उपचार घेतला होता. आस्था हॉस्पिटलकडून त्यांनी त्याबाबतची कागदपत्रे दाखल केली आहेत. आता त्यांना निशाणी ३१ व ३२ दाखविण्यात आली. ती तीच आहेत. त्यानंतर वैद्यकीय प्रमाणपत्र मध्यवर्ती रुग्णालय येथून प्राप्त केले. आता त्यांना निशाणी ३४ दाखविण्यात आली. ती तीच आहे. तसेच साक्षीदारांची टिप्पणे नोंदविली. सदर आरोपीस पोलीस ठाण्यात बोलावून त्याचा अटक फॉर्म व बेल बॉन्ड भरून घेतला. आरोपीच्या नावानिशी फिर्याद दाखल केल्याने आरोपी निष्पन्न झाला. त्यानंतर आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांनी त्याच्याविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले. त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, त्यांनी फिर्यादी यास डोक्याला टाके पडल्यानंतर उपचार कोणत्या डॉक्टरने केला याबाबत तपास केला नाही. त्यांनी डॉक्टर नरेश यांच्याकडे जाऊन तपास केलेला नाही. ज्यावेळी घटना घडली तेव्हा फिर्यादी बेशुद्ध होता याबाबत त्यांना माहिती नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार फिर्यादी हा दवाखान्यात भरती होता. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी सदर डॉक्टरांना फिर्यादी दवाखान्यात भरती असल्याबाबत विचारले होते व त्याप्रमाणे त्यांनी त्यांचा जबाब घेतलेला आहे. त्यांनी आहुजा डॉक्टरांकडे तपासकाम केले नाही. दीपक चंचलानी हे फिर्यादीचे वडील आहेत. आरती ही फिर्यादीची आई आहे. घटनास्थळी प्रत्यक्ष जाऊन स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. निशाणी ३१ व ३२ त्यांना फिर्यादीने दिलेले आहेत. इतर सर्व विधाने त्यांनी नाकारली.

१९] सरकारी वकिलांनी असा युक्तिवाद केला की, सदर आरोपीने फिर्यादी यास दुखापत केलेली आहे तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिलेली आहे. सरकारी वकिलांनी त्यांच्या युक्तिवादाच्या दरम्यान निशाणी ४१ येथे मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांचे न्यायनिर्णय दाखल केलेले आहे. मा. सर्वोच्च न्यायालय यांचा न्यायनिवाडा ***विजय शंकर शिंदे व इतर वि. महाराष्ट्र सरकार ए.आय.आर २००८ सुप्रिम कोर्ट , ११९८*** वरील न्यायनिवाडयांचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे दिसुन येते की, वास्तविक, जखमी व्यक्तीची साक्ष साक्षीदार म्हणून नोंदविण्यात आली असल्यास तिच्या साक्षीस अधिक विश्वासार्हता प्राप्त होते, कारण सामान्यतः अशी व्यक्ती खऱ्या हल्लेखोरास संरक्षण देऊन दुसऱ्या व्यक्तीला खोटेपणाने गोवण्याची शक्यता नसते. आदरपूर्वक असे नमूद करण्यात येते की, वरील उद्धृत प्रकरणातील वस्तुस्थिती व प्रस्तुत अर्जातील वस्तुस्थिती या भिन्न आहेत. त्यामुळे वरील प्रकरणातील न्यायनिर्णय प्रस्तुत अर्जास लागू होत नाही.

२०] मा. सर्वोच्च न्यायालय यांचा न्यायनिवाडा ***बालु सुदाम खालदे व इतर विरूध्द महाराष्ट्र सरकार क्रिमीनल अपील नंबर १९१० ऑफ २०१०*** वरील न्यायनिवाडयांचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे दिसुन येते की, जखमी साक्षीदाराच्या साक्षीस अधिक पुरावामूल्य (Evidentiary Value) असते आणि ती फेटाळून लावण्यासाठी ठोस व सक्तीची कारणे अस्तित्वात नसल्यास, त्यांची साक्ष सहजासहजी नाकारली जाऊ नये. आदरपूर्वक असे नमूद करण्यात येते की, वरील उद्धृत प्रकरणातील वस्तुस्थिती व प्रस्तुत अर्जातील वस्तुस्थिती या भिन्न आहेत. त्यामुळे वरील प्रकरणातील न्यायनिर्णय प्रस्तुत अर्जास लागू होत नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांचा न्यायनिवाडा ***तरूण बोरा उर्फ आलोक हजारिका विरूध्द आसाम सरकार ए.आय.आर २००२ सुप्रिम कोर्ट २९२६*** वरील न्यायनिवाडयांचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे दिसुन येते की, पीडिताच्या उलटतपासणीत त्याला अशी सूचना देण्यात आली की, आरोपीने त्याचे डोळे बांधले नव्हते तसेच त्याला मारहाणही केली नव्हती. यावरून आरोपी घटनेच्या वेळी तेथे उपस्थित होता असे दिसुन येते. आदरपूर्वक असे नमूद करण्यात येते की, वरील उद्धृत प्रकरणातील वस्तुस्थिती व प्रस्तुत अर्जातील वस्तुस्थिती या भिन्न आहेत. त्यामुळे वरील प्रकरणातील न्यायनिर्णय प्रस्तुत अर्जास लागू होत नाही. मा. उच्च न्यायालय यांचा न्यायनिवाडा ***किशोर शिंदे विरूध्द महाराष्ट्र सरकार, २००६ सी.आर.आय.एल.जे २६१८*** वरील न्यायनिवाडयांचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे दिसुन येते की, पुरावा व त्यासोबतच्या परिस्थितीवरून आरोपींनी गुन्हा केला असल्याचे सिद्ध होत असल्यास, तपासाकामातील त्रुटीचा फायदा आरोपींना देणे हे न्यायाच्या हिताचे ठरणार नाही. आदरपूर्वक असे नमूद करण्यात येते की, वरील उद्धृत प्रकरणातील वस्तुस्थिती व प्रस्तुत अर्जातील वस्तुस्थिती या भिन्न आहेत. त्यामुळे वरील प्रकरणातील न्यायनिर्णय प्रस्तुत अर्जास लागू होत नाही. मा. उच्च न्यायालय यांचा न्यायनिवाडा **उत्तम उर्फ अंबादास हिर्वाडे व इतर विरूध्द महाराष्ट्र सरकार** वरील न्यायनिवाडयांचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे दिसुन येते की, वैद्यकीय अधिकारी यांनी सदरची घटना ही खडबडीत जागेवर पडल्यामुळे होत असल्याबाबत सांगितले होते परंतु फिर्यादी यांची साक्ष पाहता त्याच्या पुराव्या असे आले होते की, सदरची जागा खडबडीत नव्हती त्यामुळे वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष ग्राह्या धरण्यात आली नव्हती. आदरपूर्वक असे नमूद करण्यात येते की, वरील उद्धृत प्रकरणातील वस्तुस्थिती व प्रस्तुत अर्जातील वस्तुस्थिती या भिन्न आहेत. त्यामुळे वरील प्रकरणातील न्यायनिर्णय प्रस्तुत अर्जास लागू होत नाही.

२१] आरोपीच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, आरोपीला दोन मुली असल्याने फिर्यादी हा आरोपीच्या दोन्ही मुली यांची छेड काढत असल्याने फिर्यादी यांची तक्रार आरोपीने सोसायटीमध्ये केली होती. त्यामुळे त्याची बदनामी झाली व सोसायटीमधुन लोकांनी फिर्यादी व त्याच्या पालकांना समजवण्यात आले होते त्याचा राग मनात धरून फिर्यादीने आरोपीविरूध्द खोटी केस दाखल केली जी फिर्यादीने पाहिले केस दाखल केली होती त्यामध्ये आरोपी निर्दोष मुक्त झाला आहे व सदर खोटी केस दाखल केल्याचे त्यांनी कथन केले.तरी त्यांनी अशी विनंती केली की, आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात यावे.

२२] प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र.१ फिर्यादी कुनाल दिपक चंचलानी (अ.सा.क्र.१) यांना तपासलेले आहे. ज्या दिवशी घटना घडली त्यावेळी त्यांचे वय १२ वर्षे होते. त्यावेळी आरोपीच्या मुलाचे वय किती होते, हे ते सांगू शकत नाहीत. त्यावेळी आरोपीचा मुलगा आठ वर्षांचा होता हे त्यांना माहीत नाही. आरोपीचा मुलगा त्यांचा मित्र नव्हता. ते व त्यांचे मित्र आरोपीच्या बिल्डिंगमध्ये तळमजल्यावर क्रिकेट खेळण्यासाठी गेले होते. ते व त्यांचे मित्र आरोपीच्या बिल्डिंगमध्ये तळमजल्यावर क्रिकेट खेळण्यासाठी गेले होते त्यावेळी जो मुलगा खेळण्यासाठी आला होता तो आरोपीचा मुलगा होता हे त्यांना माहीत नव्हते. दिनांक १३/०३/२०१३ च्या पाच महिने आधी ज्यावेळी आरोपीने त्यांचे हात बांधले होते त्यावेळी ते मनोज जेसवाणी आहेत हे त्यांना माहीत झाले. ज्यावेळी ते व भावेश आरोपीच्या घरातून निघाले त्यावेळी हेमंतने आरोपीचे नाव मनोज जेसवाणी आहे असे सांगितले. आरोपीच्या घरी ज्यावेळी त्यांना नेले होते त्यावेळी आरोपीच्या घरी त्याची पत्नी, दोन मुली व एक मुलगा असे होते. आरोपीचे घर पाचव्या माळ्यावर आहे. त्यांचा मित्र हेमंत बेहरानी हा आरोपीच्या बिल्डिंगमध्ये सहाव्या माळ्यावर राहतो. जेव्हा ते आरोपीच्या बिल्डिंगमध्ये जातात त्यावेळी पाचव्या माळ्यावर उतरतात व तेथून सहाव्या माळ्यावर जातात. त्यांनी आरोपीविरुद्ध दाखल केलेल्या नि.फौ.ख. क.२२/२०१३ मध्ये आरोपीची निर्दोष मुक्तता झाली आहे किंवा कसे, हे त्यांना माहीत नाही. पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला त्यावेळी जबाबामध्ये त्यांचे वय १५ वर्षे नमूद केले आहे, कारण ते त्यावेळी १५ वर्षांचे असतील म्हणून पोलिसांनी त्यांच्या जबाबामध्ये त्यांचे वय १५ वर्षे लिहिले आहे. जबाब देतेवेळी त्यांनी पोलिसांना सांगितले होते की, आरोपीने त्यांना व त्यांचा मित्र भावेश ओचानी असे दोघांना घेऊन त्यांच्या घरी गेले, त्यांनी त्या दोघांचे हात ओढणीने बांधले व त्यांना लाटण्याने मारहाण केली, परंतु तसा मजकूर त्यांच्या जबाबात का नमूद नाही याचे कोणतेही कारण ते सांगू शकत नाहीत. ज्यावेळी घटना घडली त्यावेळी त्यांच्यासोबत इतर कोणीही नव्हते. ते बेशुद्ध झाल्यानंतर त्यांना कोणी व कसे नेले, हे त्यांना माहीत नाही. घटनास्थळावरून डॉ. नरेश यांचा दवाखाना दोन ते पाच मिनिटांच्या अंतरावर आहे. दवाखान्यात गेल्यावर थोड्या वेळाने ८.०० ते ८.१५ वा.च्या सुमारास ते शुद्धीवर आले. त्यांना ज्या लोकांनी

दवाखान्यात घेऊन गेले होते ते लोक कोण आहेत याबाबत डॉक्टरांनी विचारपूस केली किंवा कसे, हे त्यांना माहीत नाही. नरेश डॉक्टर यांच्या दवाखान्यातून आस्था हॉस्पिटलमध्ये ते स्वतःच गेले होते. आस्था हॉस्पिटलमधून त्यांना त्याच दिवशी डिस्चार्ज मिळाला, परंतु किती वाजता सोडले ते त्यांना आठवत नाही. आस्था हॉस्पिटलमध्ये रात्री ९.०० ते ९.३० वा.च्या दरम्यान ते आस्था हॉस्पिटलमध्ये गेले होते. घडलेली घटना त्यांनी त्यांच्या आईला दिनांक १४/०३/२०१३ रोजी सांगितली. दिनांक १४/०३/२०१३ रोजी त्यांची तब्येत खराब असल्याने ते त्या दिवशी पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेले नाहीत.

२३] प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र.२ दिपक केरूमल चंचलानी (अ.सा.क्र.२) यांना तपासलेले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये मान्य केले आहे की, दि. १३.०३.२०१३ रोजी घटना घडली होती. ते कल्याणहून भिवंडीला चालले होते. त्यांच्या मुलाच्या मोबाईलवरून फोन आला व त्यांच्या मुलाचा मित्र भावेश याने त्यांना सांगितले की, हेमराज मिल्क डेअरीच्या बाजूला असलेल्या शासनाच्या खांबाच्या बाजूला त्यांचा मुलगा पडलेला आहे. जेव्हा घटना घडली तेव्हा ते घटनास्थळावर नव्हते. दि. १३.०३.२०१३ रोजीच त्यांना घटनेबाबत कळाले. रात्री ११.३० वाजता ते आस्था हॉस्पिटलला गेले. दि. १४.०३.२०१३ रोजी त्यांनी स्वतः त्यांच्या मुलाला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्यांनी पोलीसांना दि. १५.०३.२०१३ रोजी घटनेबाबत सांगितले. दि. १३.०३.२०१३ रोजी त्यांना त्यांच्या मुलाने अपघात झाल्याचे खोटे सांगितले असल्याने त्यांनी त्यादिवशी पोलीसांना तक्रार दिली नाही व दि. १५.०३.२०१३ रोजी त्यांना त्यांच्या मुलाने सदर घटनेबाबत सांगितल्याने त्यांनी त्यादिवशी पोलीसांना तक्रार दिली.

२४] प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र.३ आरती दिपक चंचलानी (अ.सा.क्र.३) यांना तपासलेले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये मान्य केले आहे की, पोलीसांनी त्यांचा जबाब दिनांक १५/०३/२०१३ रोजी पोलीस ठाण्यात घेतला होता. कुणालला सन २०१३ मध्ये गाडी चालवता येत नव्हती. त्याला त्यावेळी सायकल चालवता येत होती.

२५] प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र.४ डॉ. करण गुलाब बालानी (अ.सा.क्र.४) यांना तपासलेले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये मान्य केले आहे की, कोणताही रुग्ण हॉस्पिटलमध्ये आल्यास नेहमी प्रिस्क्रिप्शन दिले जाते. औषधे लिहून दिली जातात, परंतु ती बाहेरून खरेदी करावी लागतात. सदर रुग्णाची तपासणी करण्यापूर्वी पोलीस स्टेशनमधून कोणाचाही त्यांना फोन आला नव्हता तसेच पोलीस स्टेशनमध्ये त्यांचा जबाब नोंदविण्यात आलेला नव्हता. सदर रुग्ण फॉलोअपसाठी का

आला नाही याबाबत त्यांनी रुग्णास विचारले होते किंवा कसे, हे त्यांना आठवत नाही. बाह्यरुग्ण (Outdoor Patient) यांची कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. ते नेहमी रुग्णास आवश्यक औपचारिकता पूर्ण करून नंतर त्यांना भेटण्याचा सल्ला देतात. त्यांनी दिनांक १३.०३.२०१३ रोजी सदर रुग्णास सेंट्रल हॉस्पिटलमध्ये रेफर केले नव्हते. सदर प्रमाणपत्र रुग्णाकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार देण्यात आले होते. त्यांचे हॉस्पिटल प्रसूती (Maternity) व प्लास्टिक सर्जरी या विषयातील विशेष तज्ज्ञतेचे आहे. रुग्णाच्या वैद्यकीय इतिहासाची (Patient History) नोंद ठेवली जात नाही.

२६] प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र.५ डॉ. अंजली योगेश चौधरी (अ.सा.क्र.५) यांना तपासलेले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये मान्य केले आहे की, दिनांक १५.०३.२०१३ नंतर सदर रुग्ण त्यांच्याकडे आला नव्हता. सदर रुग्ण दिनांक १५.०३.२०१३ च्या पोलीस मेमोसह त्यांच्याकडे आला होता. सदर रुग्ण हा केवळ बाह्यरुग्ण (Outdoor Patient) होता. रुग्णाने दुखापत करणाऱ्या व्यक्तीचे नाव सांगितले नव्हते. सदर दुखापती एखादी व्यक्ती जमिनीवर पडल्यास देखील होऊ शकतात.

२७] प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र.६ नरेश मोहनदास अंबवानी (अ.सा.क्र.६) यांना तपासलेले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये मान्य केले आहे की, त्यांनी पोलीसांना कुणाल हा दोन दिवस हॉस्पिटलमध्ये भरती होता असे सांगितले होते परंतु ते त्यांच्या जबाबात दिसून येत नाही. ज्यावेळी घटना घडली त्यावेळी ते प्रत्यक्ष तेथे हजर नव्हते. त्यावेळी त्यांना कुणालला कोणी मारले याबाबत माहीत नव्हते. मग कुणाल याने सदर आरोपीने मारल्याबाबत त्यांना सांगितले होते. ते स्वतःहून सांगतात की, जेव्हा कुणालला मारले होते त्यावेळी तो बोलू शकत नव्हता. ज्यावेळी सदरची घटना घडली त्यावेळी त्यांनी पोलीसात तक्रार दाखल केली नाही.

२८] प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र.७ सागर ज्ञानदेव निकम (अ.सा.क्र.७) यांना तपासलेले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये मान्य केले आहे की, त्यांनी फिर्यादी यास डोक्याला टाके पडल्यानंतर उपचार कोणत्या डॉक्टरने केला याबाबत तपास केला नाही. त्यांनी डॉक्टर नरेश यांच्याकडे जाऊन तपास केलेला नाही. ज्यावेळी घटना घडली तेव्हा फिर्यादी बेशुद्ध होता याबाबत त्यांना माहिती नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार फिर्यादी हा दवाखान्यात भरती होता. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी सदर डॉक्टरांना फिर्यादी दवाखान्यात भरती असल्याबाबत विचारले होते व त्याप्रमाणे त्यांनी त्यांचा जबाब घेतलेला आहे. त्यांनी आहुजा डॉक्टरांकडे तपासकाम केले नाही. दीपक चंचलानी हे फिर्यादीचे वडील आहेत. आरती ही फिर्यादीची आई आहे. घटनास्थळी प्रत्यक्ष जाऊन स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. निशाणी ३१ व ३२ त्यांना फिर्यादीने दिलेले आहेत

२९] सदरकामी फिर्यादी यांनी त्याच्या सरतपासाच्या प्रतिपत्रामध्ये असे नमुद केले आहे की, आरोपीने त्याला व त्याच्या मित्र भावेश ओचानी असे दोघांना घेऊन त्याच्या घरी गेला व त्यानी दोघांचे हात ओढनीने बांधले व त्यांना लाटण्यांने मारहाण केली असे नमुद केले आहे परंतु सदरची बाब त्यांच्या जबाबात दिसुन येत नाही. फिर्यादी यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपी हा त्याच्या पाठीमागुन आला व त्याने त्याला ढकलले त्यामुळे तो पोलवर पडला व त्यामुळे त्याला जखमा झाल्या. परंतु, साक्षीदार क्रमांक ६ यास त्याने त्याचा पाय घसरून पडल्याचे सांगितले. त्याने साक्षीदार क्रमांक २ यास दिनांक १५.०३.२०१३ रोजी आरोपीने त्याला जखमी केल्याचे सांगितले. सदर फिर्यादी याने त्याच्या आईला दिनांक १४.०३.२०१३ रोजी त्याच्या आईला त्याने केवळ पडल्याबाबत सांगितले परंतु दिनांक १५.०३.२०१३ रोजी आरोपीने त्याला जखमी केल्याचे सांगितले. सदर साक्षीदार क्रमांक १ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, आरोपी याने त्याला ढकलले असल्यामुळे तो पोलवर पडला. साक्षीदार क्रमांक २ यास फिर्यादीने असे सांगितले होते की, फिर्यादीला लाईटच्या खांबावर आरोपीने आपटले. साक्षीदार क्रमांक ३ यास फिर्यादीने असे सांगितले होते की, कच-याच्या ढिगा-यात उभ्या असलेल्या लोखंडी खांब्यावर फिर्यादीला उचलुन आरोपीने फेकले. साक्षीदार क्रमांक ५ यास फिर्यादीने असे सांगितले की, त्याला भिंतीवर ढकलले होते. तसेच साक्षीदार क्रमांक ६ याने असे कथन केले की, फिर्यादीला कसे मारले हे त्यांना माहित नसल्याचे त्यांच्या पुराव्यात सांगितले. तसेच साक्षीदार क्रमांक २, ३ व ६ यांची साक्ष पाहता त्यांनी सदर घटना प्रत्यक्ष पाहिली नसल्याबाबत मान्य केले आहे तसेच सदर घटनेबाबत त्यांना ऐकिव माहिती आहे त्यामुळे सदर साक्षीदारांची साक्ष पाहता आरोपीसोबत नेमकी काय घटना घडली याबाबत साशंकता निर्माण होते. तसेच तपासी अधिकारी साक्षीदार क्रमांक ७ यांनी मान्य केले आहे की, साक्षीदार क्रमांक २ हे फिर्यादीचे वडिल आहे व साक्षीदार क्रमांक ३ ही फिर्यादीची आई आहे. तसेच घटनास्थळी प्रत्यक्ष जाऊन स्वतंत्र साक्षीदार तपासलेले नाही. सदरकामी घटनास्थळ पंचनामा निशाणी ३९ वर दाखल आहे. परंतु सदरकामी अभियोगपक्षाने दोन्ही पंचाना तपासलेले नाही. तसेच सदर पंचनाम्यामध्ये सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे निशाण दिसुन आले नाही असे नमुद आहे. त्यामुळे आरोपीविरूध्द घटनास्थळ पंचनामा सिध्द झालेला नाही.

३०] साक्षीदार क्रमांक २ यांची साक्ष पाहता दिनांक १५.०३.२०१३ रोजी फिर्यादी यांनी सांगितलेल्या घटनेवरून त्यांनी पोलीसांना तक्रार दिली होती. परंतु साक्षीदार क्रमांक ६ त्यांच्या सरतपासात दिनांक १३.०३.२०१३ रोजी साक्षीदार क्रमांक २ यांचा फोन आला होता व त्यांनी फिर्यादीला कोणी मारले आहे असे सांगितले. परंतु सदरकामी साक्षीदार क्रमांक २ यांना फिर्यादी याने सदरची घटना दिनांक

१५.०३.२०१३ रोजी सांगितल्याचे कथन केले आहे. त्यामुळे साक्षीदार क्रमांक ६ यांना दिनांक १३.०३.२०१३ रोजी फिर्यादी यांना कोणी मारल्याचे त्यांनी सांगितल्याबाबत प्रश्न उदभवत नाही. तसेच साक्षीदार क्रमांक ६ यांनी मान्य केले आहे की, त्यावेळी फिर्यादी यांना कोणी मारले हे त्यांना माहित नव्हते. सदरकामी साक्षीदार क्रमांक ४ यांना फिर्यादी याने स्वत:हुन खाली पडल्याचे व त्यांना जखमा झाल्याबाबत सांगितले होते. त्या अनुषंगाने त्यांना दिनांक १३.०३.२०१३ रोजी तपासण्यात आले होते व त्यांना पुन्हा दाखविण्याकरिता दिनांक १३.०३.२०१३ रोजी बोलाविले होते. परंतु फिर्यादी हे सदर डॉक्टरांकडे गेले नाही. त्यानंतर त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, त्यांनी निशाणी ३२ वरील वैद्यकीय प्रमाणपत्र हे दिनांक २०.०३.२०१३ रोजी फिर्यादी यांच्या सांगण्यावरून दिलेले आहे. साक्षीदार क्रमांक ७ यांनी देखील निशाणी ३१ व ३२ त्यांना फिर्यादीने दिल्याबाबत मान्य केले आहे. तसेच साक्षीदार क्रमांक ५ यांनी फिर्यादी यास दिनांक १५.०३.२०१३ रोजी तपासल्याबाबत सांगितले आहे. तसेच फिर्यादी यांना कुणीतरी भितींवर ढकल्याचे सांगितले होते. परंतु, त्यांना भिंतीवर कोणी ढकलले होते यांचे नाव व त्यांना झालेल्या दुखापती कोणामुळे झाल्या होत्या हे फिर्यादीने सांगितलेले नाही. त्यामुळे फिर्यादी यास आरोपीने ढकलल्यामुळे दुखापत झाल्या होत्या हे शाबित होत नाही. तसेच निशाणी ३२ व ३४ चे वैद्यकीय प्रमाणपत्र पाहता आरोपीने फिर्यादीला जखमी केल्याबाबत साशंकता निर्माण होते. तसेच सदरकामी तपासिक अधिकारी यांनी डॉ. नरेश यांच्याकडे जाऊन तपास केलेला नाही. फिर्यादी यास डोक्याला टाके पडल्यानंतर कोणत्या डॉक्टरने त्याचा उपचार केला याबाबतचे तपासकाम त्यांनी केलेले नाही. ज्यावेळी घटना घडली त्यावेळी फिर्यादी बेशुध्द होता याबाबत त्यांना माहित नाही. तसेच डॉ. आहुजा यांच्याकडे तपासकाम केलेले नाही. यामुळे आरोपीनेच फिर्यादी यांना उचलून इतक्या बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणे फेकले की त्यामुळे मानवी जीवित किंवा इतरांच्या वैयक्तिक सुरक्षिततेला धोका निर्माण झाला तसेच रस्त्याच्या कडेला इतक्या बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणे फेकून दुखापत केली की ज्यामुळे मानवी जीवित किंवा इतरांच्या वैयक्तिक सुरक्षिततेला धोका निर्माण झाला तसेच आरोपीने फिर्यादी यांना घाबरवण्याच्या उद्देशाने त्यांच्या जीवाला इजा करण्याची धमकी देऊन गुन्हेगारी धमकी दिली हे सदर साक्षीदारांची साक्ष पाहता शाबित होत नाही.

३१] सदरकामी आरोपीविरूध्द घटनास्थळ पंचनामा शाबित झालेला नाही. दोन्ही घटनास्थळ पंचाना सदरकामी तपासलेले नाही. तसेच साक्षीदार क्रमांक २, ३ व ६ यांनी ऐकिव माहितीवरून साक्ष दिलेली आहे. त्यांनी प्रत्यक्ष सदर घटना पाहिलेली नाही. तसेच सदरकामी तपासिक अधिकारी यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष जाऊन स्वतंत्र साक्षीदार तपासलेले नाही. निशाणी ३२ व ३४ चे वैद्यकीय प्रमाणपत्र पाहिले असता आरोपीनेच फिर्यादीला जखमी केल्याबाबत सांशकता निर्माण होते. तसेच

साक्षीदार क्रमांक ६ यांनी फिर्यादी दोन दिवस दवाखान्यात भरती असल्याबाबत सांगितले होते. परंतु, त्यांच्या जबाबात दिसुन येत नाही. सदरकामी डॉ. नरेश व आहुजा यांच्याकडे जाऊन तपासिक अधिकारी यांनी तपासकाम केलेले नाही. त्यामुळे आरोपीनेच गुन्हा केल्याबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे आरोपीविरूध्द गुन्हा सबळ पुराव्यानिशी संशयापलिकडे जाऊन शाबित झालेला नाही.

**मुद्दा क्रमांक ४ बाबत :-**

३२] मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहेत. अभियोगपक्षाने आरोपीस सिध्ददोषी ठरविण्यासाठी सबळ, संयुक्तिक व सुसंगत असा पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे आरोपी यांना निर्दोष मुक्त करणे योग्य व संयुक्तिक होईल. सबब मी मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे :

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | आरोपी मनोज मच्छाराम जेसवानी यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३३६, ३३७, ५०६ अन्वये च्या दोषारोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा पूर्वीचा जामिन व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७-अ च्या तरतुदींची पुर्तता करावी. |
| ४. | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला. |

ELSIE PATRICK RODRIGUES
Digitally signed by ELSIE PATRICK RODRIGUES
Date: 2026.08.03 17:22:57 +0530

(ई. पी. रॉड्रिक्स)
प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी
उल्हासनगर.
(२रे न्यायालय)

दिनांक :- ०३.०८.२०२६